# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 04/11/2019 (सोमवार)
# (सायंकाळ)

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. कोंढाळी :— दिनांक 14/03/2018 चे 21.06 वा. दरम्यान फिर्यादी/पिडीता यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे अप. क्र. 100/2018 कलम 354 (अ) (1) भादवी सहकलम 8, 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 13/03/2018 चे 07.15 वा. दरम्यान 13 वर्षीय पिडीत ही शाळेत जाण्याकरीता खुर्सापार फाटयावर एकटी उभी असतांना आरोपी नामे — निखील बापुराव सलाम, वय 24 वर्ष, रा. खुर्सापार हा मोटरसायकलने येऊन गाडी थांबवून पिडीतेच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. यानंतर आरोपीने दुसऱ्या दिवशी मोटरसायकलने पिडीतेच्या घरासमोर चक्कर मारून पिडीतेस त्रास दिले. आरोपीला दिनांक 14/03/2018 चे 23.30 वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्री व्हि. के. कोरडे, पो.स्टे. कोंढाळी यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक 04/11/2019 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. सुभाष कऱ्हाडे, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम 354 (अ)(आय) भादंवि. मध्ये 1 वर्ष सश्रम कारावास व 1000/—रु. दंड व दंड न भरल्यास 1 महिना शिक्षा, कलम 354 (ड) भादंवि मध्ये 1 वर्ष सश्रम कारावास व 1000/—रु. दंड व दंड न भरल्यास 1 महिना साधी शिक्षा अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती सोनाली राऊत यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी कर्मचारी म्हणुन सहा.फौज. श्री अरूण भुरे, श्री प्रमोद पाटील, श्री राजेन्द्र वानखेडे, श्री शंकर तराडे पोहवा श्री सुनिल आदमने यांनी मदत केली आहे.

## अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत 4 कि.मी. अंतरावरील मौजा माळगाव ते सावनेर रोडवर येथे दिनांक 07/10/2019 चे 07:30 वा. दरम्यान सौ. कौशल्याबाई नारायन वानखेडे, वय 67 वर्ष, रा. वार्ड क्र. 1 लोनखैरी खापरखेडा या त्यांच्या भावाचे एमएच— 40/क्यू— 8498 क्रमांकाच्या मोटरसायकलवर बसून जात असतांना खाली पडल्या. या अपघातात कौशल्याबाई वानखेडे यांच्या डोक्यावर मार लागल्याने त्यांना उपचाराकामी प्रथम एलेक्सीस हॉस्पीटल, मानकापूर नागपुर व नंतर मेडीकल कॉलेज, नागपूर येथे भरती केले असता उपचार दरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा विलास बेलसरे यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम 174 जाफौ कायद्यान्वये मर्ग नोंद करण्यात आलेला आहे. पुढील तपास पोहवा गौतम मेश्राम हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर मौजा झेंडाचौक ब्राम्हणी येथे दिनांक 03/11/2019 चे 18.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– श्रावन जगन वडे वय 57 वर्ष, रा. झेंडा चौक ब्राम्हणी यांच्या घरासमोर मनोहर श्रावण कामडे, वय 60 वर्ष, रा. यशोधरा बस स्टॉप जवळ उपलवाडी, नागपूर हे बेंटेक्सचे दागिने विकण्यासाठी आले होते. दरम्यान मनोहर कामडे यांनी फिर्यादीच्या सुनेला पिण्यासाठी पानी मागीतले पानी पिल्यानंतर अचानक मनोहर कामडे यांना चक्कर आल्याने ते खाली पडले. त्यांना उपचारासाठी ग्रामीण रूग्णालय कळमेश्वर येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ निरंजन गवई हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. खापरखेडा :– दिनांक 03/11/2019 चे 16:00 वा. पुर्वी प्रभाकर निलकंठ भोयर, वय 48 वर्ष, रा. दहेगाव रंगारी वार्ड क्र. 1 हा दहेगाव शिवारातील लेआउट मध्ये एका वाळलेल्या लिंबाच्या झाडाला नॉयलान दोरीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आल्या.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रोशन अरून भोयर, वय 48 वर्ष, रा. दहेगाव रंगारी वार्ड क्र. 1 यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार दिपक रेवतकर हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर